महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे
Rs.2/-
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ❖ १६ फेब्रुवारी २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक २३२ ❖ पाने - ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

**थोडक्यात महत्वाचे**

## शिक्षकानं संपवलं आयुष्य

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

अलिबाग येथे राहणाऱ्या एका शिक्षकाने शिवडी न्हावा शेवा अटल सेतूवरुन समुद्रात उडी मारुन आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी सकाळी घडली. वैभव पिंगळे (45) असे मृत शिक्षकाचे नाव असून सेक्सटॉर्शनच्या छळाला कंटाळून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचे बोलले जात आहे.

या घटनेचा पोलिसांकडून अधिक तपास करण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मृत वैभव पिंगळे हे अलिबाग येथील कुर्डस गावात राहण्यास होते. तसेच ते प्राथमिक शिक्षक म्हणुन कार्यरत होते. शुक्रवारी सकाळी 9 वाजण्याच्या सुमारास ते त्यांच्या क्रेटा कारने अटल सेतुवर आले होते. त्यांनतर त्यांनी आपली कार रस्त्याच्या कडेला उभी करुन पुलावरुन समुद्रात उडी मारली. पुलावरील सीसीटीव्ही नियंत्रण कक्षाने तत्काळ पोलिसांना पुलावर एक कार थांबल्याची माहिती दिल्यांनतर पोलिसांनी तत्काळ कार जवळ धाव घेतली. मात्र त्यापूर्वीच वैभव पिंगळे हे समुद्रात वाहुन गेले होते. त्यानंतर उलवे पोलिसांनी व सागरी सुरक्षा विभागाने त्यांची शोधमोहीम सुरु केली होती. मात्र रात्री उशिरापर्यंत त्यांचा मृतदेह पोलिसांच्या हाती लागला नव्हता. सायबर गुन्हेगारांकडून वैभव पिंगळे यांना सेक्सटोरशनच्या जाळयात अडकवून त्यांच्याकडून पैसे उकळण्यास सुरुवात केली होती. त्यामुळे मागील 8 दिवसांपासून ते तणावाखाली आले होते. सायबर गुन्हेगारांकडून पिंगळे यांचा मानसिक छळ वाढल्याने अखेर त्यांनी शुक्रवारी सकाळी आपल्या कारने अटल सेतू गाठले. त्यानंतर त्यांनी रस्त्याच्या कडेला आपली कार उभी करून समुद्रात उडी मारुन आत्महत्या केल्याचे पोलिसांनी सांगितले. उलवे पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद करण्यात आली असून पोलीस या घटनेचा अधिक तपास करत आहेत.

### अटल सेतू मॅरेथॉनसाठी १३ तास बंद

अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा सागरी सेतू शनिवारी रात्री ११ वाजल्यापासून रविवारी दुपारी १ वाजेपर्यंत वाहतुकीसाठी बंद राहणार आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) रविवारी, १६ फेब्रुवारीला मॅरेथॉन शर्यतीचे आयोजन करण्यात आले आहे. या मॅरेथॉन शर्यतीसाठी अटल सेतू सलग १३ तास बंद राहणार आहे. त्यामुळे नवी मुंबई, पुण्याकडे जाण्यासाठी वाहनचालक-प्रवाशांना पर्यायी मार्गाचा वापर करावा लागणार आहे. एमएमआरडीएकडून रविवारी पहाटे ४ ते दुपारी १२ या वेळेत मुंबई ते चिर्लेदरम्यान मॅरेथॉन शर्यतीचे आयोजन करण्यात आले आहे. या मॅरेथॉन शर्यतीसाठी अटल सेतूवरील वाहतूक सलग १३ तास बंद करण्यात आली आहे. त्यामुळे नवी मुंबई व पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या आणि मुंबईच्या दिशेने येणाऱ्या वाहनांना इतर पर्यायांचा वापर करावा लागणार आहे. अटल सेतूवरील ही मॅरेथॉन रविवारी पहाटे ४ ते १२ पर्यंत चालणार आहे. त्यामुळे मॅरेथॉन शर्यत संपल्यानंतर रविवारी दुपारी १ वाजल्यापासून अटल सेतूवरील वाहतूक सुरळीत होणार आहे.

## समृद्धी महामार्गावर सोळा ठिकाणी पायाभूत सुविधा केंद्रे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

मुंबई : हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर मुलभूत सुविधांबाबत उशीर होत असल्याने उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. सध्या पेट्रोल पंपाशेजारी २२ पैकी १६ ठिकाणी उपहारगृहे, प्रसाधनगृहे, वाहन दुरुस्ती केंद्रे, प्रथमोपचार, पार्किंग, पिण्याचे पाणी आदी प्रवाशांसाठी मूलभूत सुविधा संदर्भात कंत्राटदारांची निवड करण्यात आली आहे. ही कामे सुरू झाल्याची माहिती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात एका प्रतिज्ञापत्राद्वारे दिली.

कायमस्वरूपी मूलभूत सुविधा उपलब्ध होण्यास वेळ लागणार असल्यामुळे सध्या १९ ठिकाणच्या पेट्रोल पंप संचालकांना तात्पुरत्या स्वरूपातील मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची परवानगी देण्यात आली आहे, असे महामंडळाने प्रतिज्ञापत्रात नमूद केले आहे. गतिमान रस्ता पर्याय म्हणून लोकांची पसंती असलेल्या समृद्धी महामार्गावर मूलभूत सुविधा उपलब्धतेसाठी सामाजिक कार्यकर्ते अनिल वडपल्लीवार यांनी जनहित याचिका दाखल केली आहे. न्यायमूर्तीद्वय नितीन सांबरे व वृषाली जोशी यांच्यासमक्ष सुनावणी झाली. न्यायालयाने याचिकाकर्त्याला महामंडळाच्या प्रतिज्ञापत्रावर भूमिका मांडण्यासाठी येत्या ११ मार्चपर्यंत वेळ दिला. अम्मे, मेरल, डवला, मांडवा, डव्हा, रेणकापूर, वायफळ, गणेशपूर, शिवनी व कडवांची येथील १६ ठिकाणी भूसंपादित जमिनीवर या मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. सध्या त्यापैकी १३ ठिकाणी पेट्रोल पंप सुरू असून प्राथमिक स्वरूपाच्या मूलभूत सुविधाही आहेत. २०२० पासून कोव्हिडचा काळ आणि इतर विविध कारणांमुळे ही कामे अद्याप पूर्ण झालेली नाहीत. दरम्यान, ठाणे व नाशिक येथील सहा ठिकाणी पेट्रोल पंपांजवळ खासगी जमीन खरेदी करून मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. दोन ठिकाणी जमिनीचे विक्रीपत्र झाले व जमीन मालकांसोबत लीज करारही करण्यात आल्याचे सांगितले.

इंटरचेंजला वाहनांची तपासणी वायफळ, विरुळ, धामनगाव, मालेगाव, सिंदखेड राजा, निधोना, वेरुळ, शिर्डी व भारवीर येथील इंटरचेंजमध्ये नागपूर, वर्धा, अमरावती, वाशिम, अकोला, बुलडाणा, जालना, छत्रपती संभाजीनगर, श्रीरामपूर व नाशिक कार्यालयातील मोटर वाहन निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती परिवहन विभागाने न्यायालयाला प्रतिज्ञापत्राद्वारे दिली. याचिकाकर्त्यातर्फे अ‍ॅड. श्रीरंग भांडारकर तर, महामंडळातर्फे राज्याचे महाधिवक्ता वरिष्ठ अ‍ॅड. बिरेंद्र सराफ यांनी बाजू मांडली.

## गणेश नाईक घेणार ठाण्यात जनता दरबार



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

मुंबई : शिंदे गटात अस्वस्थता निर्माण करणारे राज्याचे वनमंत्री आणि पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांच्या जनता दरबाराची तारीख फिक्स झाली आहे. 24 फेब्रुवारी रोजी ठाण्याच्या मध्यवर्ती ठिकाणी जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले असल्याने मिंध्यांना थेट खुले आव्हान देण्याची तयारी भाजपने केली असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात जोरदार सुरू झाली आहे. शिंदे गटावर अंकुश ठेवण्यासाठी भाजपने ठाणे जिल्ह्याचे संपर्कमंत्री म्हणून गणेश नाईक यांची निवड केली आहे. दरम्यान नाईक यांची वनमंत्रीपदी वर्णी लागल्यानंतर काही दिवसांपूर्वी कोपरी येथे भव्य नागरी सत्कार सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी भाषणात बोलताना ठाण्याचा कारभार सुधारायचा असल्याने जनता दरबार घेणार अशी घोषणा नाईकांनी केली होती. त्यांनतर राजकीय वातावरण चांगले तापले. दरम्यान जनता दरबार कोणीही कुठेही घेऊ शकतो, महायुतीच्या मंत्र्यांनी जिकडे पाहिजे तिकडे दरबार घ्यावा, असे आवाहन नाईक यांनी करत मी लवकरच जनता दरबार घेणार असल्याची आठवण पुन्हा करून दिली असल्याने ठाण्याचे राजकारण ढवळून निघणार आहे. भाजपच्या माजी नगरसेवकांचा आग्रह

गेल्या अडीच वर्षांत ठाणेकरांना अनेक समस्यांनी ग्रासले आहे. त्यातच शिंदे गटाच्या महापालिकेच्या अधिकाऱ्यांचे चालत नसल्याने नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या कोणाच्या दरबारी मांडायच्या, असा प्रश्न लोकप्रतिनिधींना पडला आहे. त्यामुळे नाईकांनी पालघरसह ठाण्यातही जनता दरबार घ्यावा, असा आग्रह भाजपच्या माजी नगरसेवकांनी नाईकांकडे धरला होता.

## डोंबिवलीतील ६५ इमारतींवर हातोडा
## न्यायालयाचे आदेश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

डोंबिवली : डोंबिवलीमधील 65 इमारती पाडण्याचे आदेश हायकोर्टाने दिले आहेत. हायकोर्टाच्या या निर्णयामुळे तब्बल म्हात्रे नगर परिसरातील साडेसहा हजार कुटुंब बेघर होणार आहेत.

खोटी कागदपत्र खरी भासवून ही घरं विकल्याचा आरोप या इमारतींमधल्या रहिवाशांनी केला आहे. हायकोर्टाच्या या निर्णयाविरोधात काही रहिवाशी सुप्रीम कोर्टात जाणार आहेत. अधिकारी, बिल्डर आणि राजकारण्यांच्या अभद्र युतीमुळे डोंबिवलीमधून साडेसहा हजार कुटुंब बेघर होणार आहेत. आरक्षित जागेवर इमारत बांधून साडेसात हजार घरं या अभद्र युतीने विकली, यातल्या 65 इमारती पाडण्याचे आदेश हायकोर्टाने दिले आहेत. डोंबिवलीमधील एक दोन नाही तर तब्बल साडेसहा हजार कुटुंब येत्या काही दिवसांमध्ये बेघर होणार आहेत. मुंबई उच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतर डोंबिवलीमधील 65 इमारती जमीनदोस्त होणार आहेत. पण याप्रकरणी 7 तरुणांनी मिळून मोठे पाऊल उचलले आहे. खोटी कागदपत्र दाखवून घरं विकली खोटी कागदपत्र खरी भासवून बिल्डर, अधिकारी आणि राजकीय मंडळींनी घरे विकून कोट्यवधी रुपये कमावले, या बिल्डर, अधिकारी आणि राजकारण्यांच्या संपत्ती जप्त कराव्यात आणि आमची नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी या 7 तरुणांनी केली आहे. हायकोर्टाने मागणी फेटाळली असली तरी सुप्रीम कोर्टापर्यंत जाऊन या अभद्र युतीला धडा शिकवण्याचा चंग या तरुणांनी बांधला आहे.

डोंबिवलीमधील एलिट टॉवर, द्रौपदी हाईट्स, विनायक सृष्टी, मनुस्मृती अपार्टमेंट, शांताराम आक्रेड, डीएचपी गॅलेक्सी, गावदेवी हाईट्स, शिवसाई बालाजी बिल्टकॉन, साईन एनक्लेव आणि इतर काही अवैध इमारतींनी बिल्डिंग नियमित करण्यासाठी महापालिकेकडे अर्ज केले. या अर्जावर निर्णय होईपर्यंत कारवाई होऊ नये, अशी विनंती इमारतीच्या नागरिकांनी हायकोर्टात केली, पण हायकोर्टाने गॅलेक्सी इमारतीचा अर्ज फेटाळला, तसंच इतर इमारतींसाठीही तोच निर्णय असेल, असं हायकोर्टाने स्पष्ट केलं.

## विविध योजनांच्या पूर्तीसाठी सरकार करणार काटकसर
### घोषणापूर्ततेसाठी घेतला मोठा निर्णय

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

मुंबई : राज्य सरकारने जाहीर केलेल्या विविध योजनांच्या पूर्ततेसाठी, चालू आर्थिक वर्षात महसुली आणि भांडवली खर्चात कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. वित्त विभागाने घेतलेल्या या निर्णयानुसार, कर्मचाऱ्यांचे वेतन, पाणी, वीज, दूरध्वनी खर्चांना प्रामुख्याने परवानगी देण्यात आली आहे, मात्र बक्षिसे, विदेश विमान प्रवास, प्रकाशने, संगणक खर्च, मोटार वाहने इत्यादी खर्चावरही कात्री लावण्यात आली आहे. राज्य सरकारने सन २०२४-२५ च्या पहिल्या नऊ महिन्यांसाठी आवश्यक असणाऱ्या अनिवार्य व कार्यक्रमांतर्गत खर्चाचा अर्थसंकल्पित निधी, एकूण वार्षिक तरतुदीच्या ७० टक्क्यांच्या मर्यादेत अर्थसंकल्पीय अंदाज, वाटप आणि संनियंत्रण प्रणालीवर वितरित करण्याबाबत परिपत्रक जाहीर केले आहे. जिल्हा वार्षिक योजना, आमदार स्थानिक विकास कार्यक्रम, केंद्र पुरस्कृत बाह्य सहाय्यित योजनेतील केंद्र व राज्य हिस्सा, केंद्र सरकारकडून राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष साह्य योजनेअंतर्गत ५० वर्षे मुदतीचे बिनव्याजी कर्ज, तसेच १५ व्या वित्त आयोगाच्या तरतुदीत योजनांच्या निधी वितरणाची मर्यादा १०० टक्के असणार आहे. वेतनासाठी ९५ टक्के, मजुरी ९० टक्के, अतिकालिक भत्ता ८० टक्के, निवृत्तिवेतन विषयक खर्च १०० टक्के, दूरध्वनी, वीज व पाणी देयके ८० टक्के, कंत्राटी सेवा ९० टक्के, कार्यालयीन खर्च ८० टक्के, भाडेपट्टी व कर ८० टक्के, शस्त्रे व दारूगोळा ८० टक्के, पेट्रोल- तेल वंगण ८० टक्के, व्यावसायिक सेवा ८० टक्के, शिष्यवृत्त्या, विद्यावेतन १०० टक्के, सहायक अनुदाने ९५ टक्के, व्याज १०० टक्के, कर्जाची परतफेड १०० टक्के, आंतरलेखा हस्तांतरणे १०० टक्के आणि यंत्रसामग्री व उपकरणे यांची देखभाल व दुरुस्ती ८० टक्के निधी वितरणाची मर्यादा ठेवण्यात आली आहे. यासंदर्भातील, निधी वितरणाचा प्रस्ताव मंजूर करताना, ठोस कारणांशिवाय मंजुरी दिली जाणार नाही, अशा सूचना परिपत्रकाद्वारे करण्यात आल्या आहेत. १८ फेब्रुवारीपर्यंत मंजुरी घेण्याचे बंधनकारक करण्यात आले आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण, लाडका भाऊ, शेतकऱ्यांना मोफत वीज अशा घोषणांमुळे दोन लाख कोटींपेक्षा अधिकची वित्तीय तूट भरून काढण्यासाठी, तसेच पुरेसा निधीचा अभाव यामुळे, सरकारला निधीला कात्री लावावी लागत असल्याचे बोलले जात आहे. जुलै २०२४ आणि डिसेंबर २०२४ मधील पुरवणी मागण्यांचा निधी वितरित करण्यापूर्वी त्याच्या आवश्यकतेनुसार वित्त विभागाची मान्यता पुरवणी मागणीच्या मूळ नस्तीमधून घेण्याची सूचनाही या परिपत्रकात करण्यात आली आहे.

## मुंबई विद्यापीठात क्रिकेटचं पदवी शिक्षण !

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

मुंबई: तुम्ही क्रिकेट खेळत आहात ? त्यातील विविध अंगांचा अभ्यासही आहे? मग आता क्रिकेटचा अभ्यास करून तुम्हाला पदवीधर होता येणार आहे. मुंबई क्रिकेट संघटना (एमसीए) लवकरच मुंबई विद्यापीठाच्या सहकार्याने असा पदवी अभ्यासक्रम सुरू करणार आहे. संघटनेच्या कार्यकारिणीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

### प्रत्यक्ष मैदानावर शिकण्याचा अनुभव

क्रिकेट हा व्यावसायिक खेळ झाला आहे. त्यासाठी अनेक क्षेत्रांतून मदत मिळत असते. मैदानाची निगा, तसेच खेळपट्टी तयार करणारे, व्हिडीओ विश्लेषक, प्रशिक्षण, स्कोअरिंग, पंच यांसारख्या विविध बाबींमध्ये या अभ्यासक्रमाद्वारे प्रावीण्य मिळवता येईल. यात क्रिकेटपटूंना प्रत्यक्ष मैदानावर शिकण्याचा अनुभव मिळेल. खेळताना त्यांना विविध विषयांत व्यावसायिक कौशल्य मिळवता येईल. त्याचबरोबर त्यांना शैक्षणिक पात्रताही मिळेल', असे एमसीएचे अध्यक्ष अजिंक्य नाईक यांनी 'झी 24 तास'ला सांगितलं आहे.

### अभ्यासक्रमात काय शिकवणार?

मुंबई क्रिकेट असोसिएशनकडून क्रिकेट नॉलेज सेंटर चालवण्यात येते. क्युरेटर,





स्कोरर, अंपायर याचा एक भाग आहे. खेळपट्टी तयार करणारे, व्हिडीओ विश्लेषक, प्रशिक्षण, स्कोअरिंग, पंच यांसारख्या विविध अभ्यासक्रमाचा समावेश आहेत. या पार्श्वभूमीवर मुंबई युनिव्हर्सिटीसोबत एकत्र येऊन ग्रॅज्युएशन अभ्यासक्रम चालवला जाणार आहे. मुंबई विद्यापीठात हायब्रीड प्रोग्रॅम आहेत. चांगल्या नोकरीसाठी ग्रॅज्युएशन महत्त्वाचा आहे. यासंदर्भात मुंबई विद्यापीठाची प्रायमरी चर्चा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. अनेक खेळाच्या संदर्भात अभ्यासक्रम मुंबई विद्यापीठात आहेत. त्याच्याशीच आम्हाला संलग्न व्हायचे आहे. माजी क्रिकेटपटू निलेश कुलकर्णी यावर काम करत आहेत. सगळ्यांची मदत घेऊन हा प्रोग्राम यशस्वीपणे राबवू, असे एमसीए अध्यक्षांनी सांगितले.

कोण घेऊ शकत अभ्यासक्रमात सहभाग? या अभ्यासक्रमात प्रवेश घेणारा विद्यार्थी मुंबई क्रिकेट असोसिएशनचा सदस्य असावा. त्याने अंडर 19, 23 वर्षाखाली खेळले पाहिजे. हे लक्ष्य ठेवून हा कार्यक्रम सुरू केला जाणार आहे. क्रिकेटमधल्या वेगवेगळ्या टेक्निक शिकवणारे हे हायब्रीड मॉडेल आहे.



## डाळींची आवक वाढली भाव घसरले

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

मुंबई: महाराष्ट्र सध्या डाळी उत्पादनात आघाडीवर आहे. येत्या काळात भारत उत्पादनात आत्मनिर्भर होईल. डाळवर्गीय पिकांसंदर्भात या क्षेत्रातील संशोधन आणि पायाभूत सुविधांच्या विकासात सरकार, शेतकरी, संशोधक आणि उद्योग भागधारकांनी सर्वसमावेशक दृष्टिकोन स्वीकारल्यास उत्पादन क्षमतेत अधिक वाढ होईल, असा विश्वास पणन मंत्री जयकुमार रावल यांनी शुक्रवारी व्यक्त केला. नवी दिल्लीत 'भारत मंडपम' येथे भारतीय डाळी आणि धान्य संघटनेच्या वतीने आयोजित भारतीय डाळी परिषदेतर्फे समृद्धीसाठी डाळी शाश्वततेसह पोषण' या चर्चासत्रात ते बोलत होते.

यंदाच्या हंगामात उत्पादनात वाढ झाल्याने गेल्या दोन महिन्यांत तूरडाळीच्या दरात किलोमागे ५० ते ६० रुपयांनी घट झाली आहे. तूरडाळीसह चणाडाळीच्या दरात १५ ते २० रुपये, तसेच उडीद डाळीच्या दरात पाच ते सात रुपयांनी घट झाल्याने गृहिणींना दिलासा मिळाला आहे. कर्नाटकातील तूरडाळीचा हंगाम



सुरू झाला असून, मार्केट यार्डातील भुसार बाजारात सध्या आवक मोठ्या प्रमाणावर होत आहे. यंदा कर्नाटकात तूरडाळीची लागवड मोठ्या प्रमाणावर झाली आहे. मराठवाडा, विदर्भ आणि गुजरातमधील तूरडाळीचा हंगाम सुरू झाला आहे. आवक वाढल्याने दरात घट झाली आहे. मागणीच्या तुलनेत आवक मोठ्या प्रमाणावर होत असल्याने गेल्या दोन महिन्यांत तूरडाळीच्या दरांत प्रतिकिलोमागे ५० ते ६० रुपयांनी घट झाली आहे. जून-जुलै महिन्यात तूरडाळीचे दर कडाडले होते. त्या वेळी घाऊक बाजारात एक किलो तूरडाळीला १७५ रुपये किलो असा उच्चांकी दर मिळाला होता. नोव्हेंबरमध्ये दरात दहा रुपयांनी घट झाली. सध्या घाऊक बाजारात डाळीचे प्रतिकिलोचे दर प्रतवारीनुसार १०७ ते १३० रुपये किलोदरम्यान आहेत.

**नोव्हेंबर २०२४ - फेब्रुवारी २०२५**

तूरडाळ - १६५ ते १८०
रुपये १०५ ते १२० रुपये
चणाडाळ - ८८ ते ९४
रुपये ७५ ते ८० रुपये
उडीद डाळ - ११५ ते १२०
रुपये १०० ते ११० रुपये

**आवक वाढण्याचा अंदाज**

यंदाच्या हंगामात तूरडाळीचे उत्पादन ४४ लाख टन होण्याची शक्यता आहे. मार्केट यार्डातील घाऊक बाजारात दररोज ८० ते १०० टन तूरडाळीची आवक होत आहे. येत्या काही दिवसांत आवक वाढण्याची शक्यता असून, दरांमध्ये आणखी घट होण्याची शक्यता आहे, असे मार्केट यार्डातील व्यापारी जितेंद्र नहार यांनी सांगितले.

## गीतासार



प्रसादे सर्वदुःखानां हानिरस्योपजायते ।
प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवतिष्ठते ॥२- ६५॥

अंतःकरण प्रसन्न असल्यामुळे त्याची सर्व दुःखे नाहीशी होतात. आणि त्या चित्त प्रसन्न असलेल्या कर्मयोग्याची बुद्धी तत्काळ सर्व गोष्टींपासून निवृत्त होऊन एका परमात्म्यामध्येच उत्तम प्रकारे स्थिर होते. ॥ २-६५ ॥

नास्ति बुद्धिरयुक्तस्य न चायुक्तस्य भावना ।
न चाभावयतः शान्तिरशान्तस्य कुतः सुखम् ॥२- ६६॥

मन आणि इंद्रिये न जिंकणाऱ्या मनुष्याच्या ठिकाणी निश्चयात्मक बुद्धी नसते आणि अशा अयुक्त मनुष्याच्या अंतःकरणात आस्तिक भावही नसतो. तसेच भावशून्य माणसाला शांती मिळत नाही. मग शांती नसलेल्या माणसाला सुख कोठून मिळणार? ॥ २-६६ ॥

इन्द्रियाणां हि चरतां यन्मनोऽनु विधीयते ।
तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नावमिवाम्भसि ॥२- ६७॥

कारण ज्याप्रमाणे पाण्यात चालणाऱ्या नावेला वारा वाहून नेतो, त्याचप्रमाणे विषयात वावरणाऱ्या इंद्रियांपैकी मन ज्या इंद्रियाबरोबर राहते, ते एकच इंद्रिय या अयुक्त पुरुषाची बुद्धी हिरावून घेते ॥ २-६७ ॥

## आरोग्य टिप्स

### उच्च रक्तदाब : काळजी

डॉक्टरांकडून नियमित तपासणी करून घ्या: उच्च रक्तदाबाच्या रुग्णांनी डॉक्टरांकडून नियमित तपासणी करून घ्यावी आणि वेळेवर औषधे घ्यावीत.

निरोगी जीवनशैलीचा अवलंब करा: संतुलित आहार: मीठ, चरबी आणि साखरेचे सेवन कमी करा. फळे, भाज्या, संपूर्ण धान्य, दुग्धजन्य पदार्थ आणि मासे यांचे सेवन वाढवा.

नियमित व्यायाम: आठवड्यातून किमान 30 मिनिटे मध्यम तीव्रतेचा व्यायाम करा.

ताण व्यवस्थापन: योगासने, ध्यानधारणा, संगीत ऐकणे किंवा छंद जोपासून ताण कमी करा.

पुरेशी झोप घ्या: रात्री 7-8 तासांची झोप घ्या.

धूम्रपान सोडा: धूम्रपानामुळे उच्च रक्तदाब वाढतो, म्हणून ते ताबडतोब सोडा.

औषधे वेळेवर घ्या: डॉक्टरांनी सांगितलेली औषधे वेळेवर घ्या आणि डॉक्टरांचा सल्ला घेतल्याशिवाय औषधे बदलू नका किंवा थांबवू नका.

रक्तदाब नियमितपणे तपासा: घरी रक्तदाब मोजणाऱ्या उपकरणाचा वापर करून तुमचा रक्तदाब नियमितपणे मोजा.

कुटुंब आणि मित्रांना कळवा: तुमच्या उच्च रक्तदाबाबद्दल तुमच्या कुटुंबाला आणि मित्रांना सांगा जेणेकरून ते तुम्हाला मदत करू शकतील.

उच्च रक्तदाबाच्या रुग्णांनी काय करू नये:

जास्त प्रमाणात मीठ सेवन: जास्त प्रमाणात मीठ सेवन केल्याने रक्तदाब वाढतो.

जास्त चरबीयुक्त पदार्थ: चरबीयुक्त पदार्थांमुळे उच्च रक्तदाब होऊ शकतो.

ताण: ताणामुळे उच्च रक्तदाब वाढतो.

औषधोपचार बंद करणे: डॉक्टरांचा सल्ला घेतल्याशिवाय औषधोपचार बंद करणे धोकादायक ठरू शकते.

स्वतःहून उपचार: डॉक्टरांचा सल्ला घेतल्याशिवाय कोणतेही औषध किंवा उपचार घेऊ नका.

तेथे कर माझे जुळती

# सेनापती तात्या टोपे जयंती

## (१६ फेब्रुवारी १८१४-१८ एप्रिल १८५९)



इंग्रजांनी आपल्या साम्राज्याचे जाळे हळूहळू पसरवण्यास सुरुवात केली. व्यापाराच्या निमित्ताने आलेले इंग्रज राज्यकर्ते होऊ लागले. सत्ता प्रस्थापित करताना देशातील विविध प्रांतांमध्ये त्यांनी भयानक जुलूम केला .जुलुमाच्या अतिरेकामुळे महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये त्याकाळी बंडाच्या ठिणग्या उडू लागल्या.1857 च्या बंडामुळे सबंध भारतात असंतोषाच्या प्रतिक्रिया उमटू लागल्या. त्याकाळी बहादूर शाह जफर बादशहाने गोहत्या बंदीचा हुकूम काढला .त्याची प्रेरणा घेऊन सर्वच राज्यांनी इंग्रजांविरुद्ध तलवारी उपसल्या .त्यावेळी नानासाहेब पेशव्यांनी सुद्धा दिल्लीच्या सत्ताधीशांवर निष्ठा प्रकट केली. कुवरसिंह तात्या टोपे अहमदशहा यांनी इंग्रजांविरुद्ध लढ्याचे नेतृत्व केले . आयोध्या प्रांताचे नेतृत्व मौलवी अहमदशाह यांनी केले,असे निदर्शनास येते.

रघुनाथ पांडुरंग येवलेकर उर्फ तात्या टोपे यांच्या जन्म दिनांक 16 फेब्रुवारी1814 रोजी ,रामनवमीच्या दिवशी नाशिक जिल्ह्यातील येवले या गावी झाला. तात्या हे त्यांचे लहापणीचे टोपण नाव होते.त्याचे मूळचे घराणे नाशिक जिल्ह्यातले होते. त्याकाळी नानासाहेब पेशव्यांच्या सैन्याचे सेनापती म्हणून त्यांची नेमणूक करण्यात आली होती .ते अतिशय सुदृढ व देखणे होते. तात्यांच्या वागण्याची ऐट , कामगिरी,देशभावना व विद्वत्ता पाहून पेशव्यांनी खुश होऊन त्यांना रत्नजडीत टोपी बक्षीस देऊन त्यांचा सन्मान केला होता.ती टोपी गौरव स्मृती समजून लोक येवलेकर यांना तात्या टोपे असे म्हणून घेऊ लागले. तात्या टोपे एक महान सेनापती होते.किंबहुना गनिमी काव्यात हुशार असलेल्या टोपे यांनी इंग्रजांविरुद्ध लढ्याचे नेतृत्व केले व त्यांना जेरीस आणले होते.

तात्या टोपे व नानासाहेब पेशव्यांना पकडण्यासाठी एक लाख रुपयांचे बक्षीस त्याकाळी ब्रिटिशांनी जाहीर केले होते . प्रतिकूल परिस्थितीमध्ये ग्वाल्हेरचा किल्ला त्यांनी घेतला. इंग्रजांविरुद्ध दिल्ली, लखनऊ, जगदीशपूर व कानपूर या प्रमुख चार ठिकाणी उठाव झाले. या उठावाचे सूत्रधार तात्या टोपे होते. तात्या टोपे व राणी लक्ष्मीबाई यांनी गांभीर्याने इंग्रजांच्या विरोधात खरी लढत दिली .पण अन्य सरदार मात्र अतिशय बेशिस्तीने वागत होते .त्यामुळे या दोघांना अनेक ठिकाणी हार खावी लागली .तात्या टोपे डोंगरदऱ्या मधून अतिशय सफाईने जात असत. दलदलीच्या प्रदेशातून अनेक मैल मजल मारत असत. त्यामागे शत्रूला हुलकावणी देणे हेच त्यांचे तत्त्व असे. उत्तरेकडे नानासाहेब तर नर्मदेच्या अलीकडे तात्या टोपे आणि रावसाहेब राहिले. तात्या नर्मदा पार पाडून नानासाहेबां कडे चालू लागले. मात्र त्याच वेळी मानसिंगाने केलेल्या विश्वासघातामुळे 7 एप्रिल 1859 रोजी एका रण्यात ते पकडले गेले. त्यांच्यावर इंग्रजांनी लष्करी खटला चालवला. अतिशय निर्भयतेने ते खटल्याला सामोरे गेले. ..नानासाहेब पेशव्यांचा सेनापती म्हणून शत्रू पक्षाकडील काही सैनिकांची माझ्याकडून हत्या झाली, मी माझे कर्तव्य केले. मी इंग्रजांच्या राज्यात जन्मलो नाही किंवा मी तुमचा प्रजाजन ही नाही .तेव्हा मी राष्ट्रद्रोही कसा असेल?.. तात्यांच्या या तर्कशुद्ध जबानी कडे इंग्रजांनी अक्षरशः दुर्लक्ष केले आणि 18 एप्रिल 1859 रोजी त्यांना फाशी दिले. सशस्त्र संघर्षाशिवाय स्वातंत्र्य मिळणार नाही, असे तत्त्व आपल्या बलिदानाने तात्या टोपे यांनी सिद्ध केले. स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या या महान सेनापतीस शतशः प्रणाम!



डॉ. आनंदराव सूर्यवंशी

# मृतांच्या संपत्तीवर वारसदारच हक्कदार

## हायकोर्टाचा निर्णय

नॉमिनी अधिकृत वारसदार नसेल तर, त्याचा मृत व्यक्तीच्या संपत्तीवर कोणताही अधिकार नसतो. अशा संपत्तीचे खरे हक्कदार मृताचे अधिकृत वारसदारच असतात. त्यामुळे संबंधित संपत्ती वारसदारांमध्ये सारख्या प्रमाणात वितरित करणे आवश्यक आहे, असा महत्त्वपूर्ण निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठातील न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फलके यांनी दिला. नागपुरातील दिवंगत गोपालकृष्ण शिवहरे यांना लक्ष्मीकांत व श्रीराम ही दोन मुले आणि शैल व संतोष या दोन मुली होत्या. शैल यांनी लक्ष्मीकांत यांचा मुलगा अभिषेकला दत्तक घेतले होते. त्या महापालिकेच्या ग्रंथालय विभागात कर्मचारी होत्या. सेवानिवृत्तीनंतर त्यांचा ६ मे २०१३ रोजी मृत्यू झाला. त्यांनी अभिषेकला बँक खात्यांमध्ये नॉमिनी केले होते. त्यामुळे अभिषेकने शैल यांच्या निधनानंतर त्यांच्या बँक खात्यातील ९० हजार १५० रुपये काढले आणि उर्वरित रक्कमही काढण्याचे प्रयत्न सुरू केले होते. त्यावर श्रीराम व संतोष यांनी आक्षेप घेतला होता. हे प्रकरण उच्च न्यायालयात पोहोचल्यानंतर अभिषेकची कृती अवैध ठरविण्यात आली. नॉमिनीला केवळ बँक खातेधारकाचे अधिकार प्राप्त होतात. खातेधारकाच्या मृत्यूनंतर बँकेतील रक्कम नॉमिनी काढू शकतो. परंतु, नॉमिनी त्या रकमेचा मालक बनत नाही. ती रक्कम वारसाहक्कानुसारच वितरित करावी लागते, असेही उच्च न्यायालयाने निर्णयात नमूद केले. श्रीराम व संतोष यांनी शैल यांच्या बँक खात्यातील रक्कम स्वतः सह लक्ष्मीकांत यांना वाटप व्हावी, यासाठी सुरुवातीला वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालयात अर्ज केला होता. परंतु, या न्यायालयाने या तीन वारसदारांना केवळ ६० हजार ९९३ रुपयांत वाटा दिला होता. श्रीराम व संतोष यांनी वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालयाचा निर्णय अमान्य करून त्याविरुद्ध जिल्हा न्यायालयात अपील दाखल केले होते. जिल्हा न्यायालयाने वादग्रस्त निर्णयात बदल करून तीन वारसदारांना १५ लाख १२ हजार १५६ रुपयांमध्ये वाटा दिला.

# जीवनदीप महाविद्यालयात आयकर जनजागृती व्याख्यान






दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / गोवेली : जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई संचलित कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय गोवेली येथे आज दि.14 फेब्रुवारी 2025 रोजी आयकर जनजागृती व ट्रस्ट मार्गदर्शन व्याख्यान चे आयोजन करण्यात आले होते. यावेळेस प्रमुख अतिथी म्हणून आयकर अधिकारी मनीष कुमार गुप्ता हे उपस्थित होते. त्याचबरोबर त्यांचे सहकारी प्रशांत कदम, अभिलाष शाक्य, नंदू परदेशी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोड विंदे यांनी केले तेव्हा ते म्हणाले नुकताच आपला अर्थसंकल्प जाहीर झाला आहे. अर्थसंकल्पाबद्दल सविस्तर माहिती जाणून घेणं महत्त्वाचं आहे. आणि हा उद्देश समोर ठेवूनच या कार्यक्रमाचं आयोजन केलं गेलं आहे. त्यानंतर प्रशांत कदम यांनी या अर्थसंकल्पाबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच आयकर प्रणाली, कर सवलती, ट्रस्ट व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा दिनेश धनगर यांनी केले.यावेळेस शानू राज, शिवराम मीना,संजीव सद्दामी ,नितेश बोबडे तसेच महाविद्यालयाचे संचालक प्रशांत घोडविंदे ,उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे, सर्व प्राध्यापक प्राध्यापिका आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# भिवंडी महानगरपालिका प्रभागात स्वच्छता हीच सेवा मोहिम



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / भिवंडी : भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने शासनाचे परिपत्रक व मा. पंतप्रधान महोदयांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या स्वप्नातील स्वच्छ भारताची संकल्पना साकारण्यासाठी आवाहनानुसार व शासन परिपत्रकातील निर्देशानुसार प्रभाग समिती क्र. ०३ वार्ड क्रमांक २१ मधील कामतघर आरोग्य केंद्र आणी कामतघर व-हाळ देवी गणेश घाट व कामतघर गणेश घाटांवर सफ़ाई मोहिम सुरु करण्यात आली. या प्रसंगी स्व. मनोज मोतिराम काटेकर क्रिडांगणाची सुध्दा साफ़ सफ़ाई करण्यात आली मा. प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी व अतिरिक्त आयुक्त तसेच उप-आयुक्त यांचे आदेशानुसार १०० दिवसीय कृती आराखड्या नुसार आज कामतघर या परिसरात साफ़ सफ़ाई मोहीम करुन त्याचा आढावा सहायक्त आयुक्त श्री सुरेद्र भोईर व मुख्य आरोग्य निरिक्षक लिलाधर जाधव यांनी घेतला नागरिकांनी ह्या स्वच्छ मोहिमेत मोठ्या प्रमाणात सहभाग घेऊन जास्तीत जास्त श्रमदान करण्याचे आवाहन प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर (भा.प्र.से) यांनी केले आहे.

# निष्कलंक, चारित्र्याचे अजातशत्रू व्यक्तिमत्व

## आर.आर.पाटील



राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्व अशी ओळख असलेले निष्कलंक चारित्र्याचे माजी उपमख्यमंत्री रावसाहेब राजाराम पाटील उर्फ आर आर पाटील यांचा आज स्मृतिदिन. आजच्याच दिवशी म्हणजे १६ फेब्रुवारी २०१५ रोजी आर आर पाटील यांचे अल्पशा आजाराने निधन झाले होते. आर आर पाटील यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला होता. आर आर पाटील म्हणजे राजकारणातील आम आदमी. शेतकरी असोत की सर्वसामान्य नागरिक, गरीब असोत की वंचित प्रत्येकाला आर आर पाटील आपले वाटत होते. राजकारणात उपमुख्यमंत्री पदासारख्या मोठ्या पदापर्यंत पोहचूनही कायम जमिनीवर राहून जनतेशी नाळ टिकवलेले आर आर पाटील सर्वसामान्यांचे नेते होते म्हणूनच त्यांना सर्वसामान्य नागरिक त्यांना प्रेमाने आबा म्हणत. १६ ऑगस्ट १९५७ रोजी सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील अंजनी गावात एका गरीब शेतकरी कुटुंबात आबांचा जन्म झाला. घरची परिस्थिती गरिबीची असल्याने आबांनी कमवा आणि शिका या योजनेतून शिक्षण घेतले. बी ए झाल्यानंतर त्यांनी एलएलएलबी चे ही शिक्षण घेतले. कॉलेज जीवनातच त्यांनी शेतकऱ्यांचे, सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न शासन दरबारी मांडायला सुरुवात केली. त्यांच्यातील नेतृत्व गुण वसंत दादा पाटलांनी हेरले आणि त्यांना राजकारणात आणले. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना समाजासाठी काहीतरी करण्याची जिद्द, मनाला भिडणारी भाषण शैली आणि स्वच्छ प्रतिमेच्या जोरावर त्यांनी अल्पावधीतच राजकारणात बस्तान बसवले. १९७९ साली पहिल्यांदा जिल्हा परिषद सदस्य म्हणून आबा निवडून आले. १९७९ ते १९९० असे एकवीस वर्ष आबा जिल्हा परिषद सदस्य होते. १९९० साली आबांनी पहिल्यांदा विधानसभेची निवडणूक लढवली आणि प्रचंड मतांनी जिंकली. त्यानंतर २०१४ पर्यंतच्या विधानसभेच्या सर्व निवडणुका आबांनी जिंकल्या. १९९५ साली आबा दुसऱ्यांदा आमदार झाल्यावर राज्यात युतीचे सरकार आले. विरोधी पक्षात असलेल्या आबांनी राजकीय आयुधांचा वापर करून अनेकदा सत्तधाऱ्यांना कोंडीत पकडले. विरोधी पक्षात असूनही आबांनी विधानसभा गाजवून सोडली. १९९९ साली राष्ट्रवादीची स्थापना झाल्यावर ते राष्ट्रवादीत आले. शरद पवार यांचे अत्यंत विश्वासू साथीदार अशी त्यांची ओळख बनली. त्यांनीही राष्ट्रवादी घराघरात पोहचवण्यासाठी जीवाचे रान केले. ते काही काळ राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्याचे अध्यक्ष होते. राज्य मंत्रिमंडळात त्यांना अनेक महत्वाची पदे मिळाली. आर आर पाटील ग्रामविकास मंत्री असताना त्यांनी संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान यशस्वीपणे राबवून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. पुढे राज्याचे गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारीही त्यांनी स्वीकारली. गृहमंत्री असताना त्यांनी राज्यातील डान्स बार बंद करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. डान्स बार बंद करण्याचा त्यांच्या निर्णयाला कडाडून विरोध झाला पण ते आपल्या निर्णयावर ठाम राहिले. गृहमंत्री असतानाच त्यांनी महात्मा गांधी तंटामुक्ती अभियान राबवले. गृहमंत्री असताना त्यांनी खाजगी सावकारी विरूध्दही दंड थोपटले होते तसेच त्यांनी गुटखा बंदी करण्याचा देखील निर्णय घेतला होता. त्यांच्या याच धडाकेबाज निर्णयांनी त्यांनी सर्वसामान्यांच्या मनात आदराचे स्थान निर्माण केले होते. गृहमंत्री, उपमुख्यमंत्री अशी मोठी पदे भूषवूनही आबांनी तळागळातील कार्यकर्त्यांशी असलेला संवाद तुटू दिला नाही. सत्ता येते आणि जाते जोडलेले माणसे टिकवली पाहिजेत हे आबांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. उच्च पदावर पोहचूनही आबांनी आपला साधेपणा कायम ठेवला. इतक्या मोठ्या पदावर असतानाही आबांनी आपल्या पाल्यांना महागड्या इंग्रजी शाळेत न घालता जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत घातले होते. आबांसारखे तळागळातून आलेले स्वच्छ चारित्र्याचे निष्कलंक, अजातशत्रू व्यक्तिमत्व राजकारणात विरळच. सध्याच्या गढूळ राजकीय वातावरणात तर आबांसारख्या निष्कलंक चारित्र्याच्या नेत्याची आवर्जून आठवून येते. राजकारणात त्यांनी जो आदर्श घालून दिला आहे त्याचे अनुकरण आजच्या राजकीय नेत्यांनी केले तरच राजकीय नेत्यांवरील जनतेचा उडालेला विश्वास पुन्हा प्राप्त होईल. आबांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

-श्याम ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# जिल्हा परिषद शाळा वाकळणसाठी आमदारांकडून निधीची घोषणा




कल्याण : कल्याण पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या अंतर्गत येत असलेल्या जिल्हा परिषद शाळा वाकळण केंद्र दहिसर तालुका कल्याण या शाळेच्या वार्षिक स्नेह संमेलन कार्यक्रमाच्या निमित्ताने कल्याण ग्रामीण चे आमदार राजेश मोरे यांनी शाळेच्या विकासासाठी तब्बल२५लाखांचा निधी देत असलेल्याची घोषणा केली. त्यामुळे शाळेचे मुख्याध्यापक, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, आणि ग्रामस्थांनी त्यांचे स्वागत केले. कल्याण पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या जिल्हा परिषद शाळा वाकळण या शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम नुकताच आयोजित करण्यात आला होता, या शाळेला सुमारे१००वर्षे पूर्ण झाली असून त्यानिमित्ताने या कार्यक्रमासाठी कल्याण ग्रामीण चे आमदार राजेश मोरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गुरुनाथ भोईर यांनी त्यांचे स्वागत केले, यावेळी बोलताना आमदार श्री मोरे म्हणाले, मीही शाळेचा विद्यार्थी होतो, शिक्षकांचा,आईवडिलांचा आशीर्वाद महत्त्वाचा असतो, शाळेला मुलभूत सोईसुविधा मिळाल्या पाहिजे यासाठी आमदार निधीतून २५लाखांचा निधी देत असल्याची घोषणा त्यांनी यावेळी केली. तसेच बिल्डर लोढा यांच्याशी बैठक घेऊन रस्त्याचा प्रश्न सोडवू असे आश्वासन ही दिले, यावेळी उपाध्यक्ष संजय साळुंखे, दर्शन भोईर, केतन म्हात्रे,**बाळासाहेब जगदाळे, ग्रामपंचायत कर्मचारी रवींद्र भोईर, रतन खुटारकर, मुख्याध्यापक शंकर साळवी, व कार्यकर्ते, ग्रामस्थ ,पालक मोठ्या संख्येनेउपस्थित होते. तर जिल्हा परिषद शाळा वाकळण च्या मुला मुलींनी विविध कला गुण दर्शनांने उपस्थितांची मने जिंकली.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558


news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
Follow, Unfollow, & Create Them
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# उडान फेस्टिवलमध्ये जीवनदीप महाविद्यालय गोवेलीचे घवघवीत यश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

गोवेली : जीवनदीप महाविद्यालय गोवेलीच्या विद्यार्थ्यांच्या कलागुणांना यश मिळालं दि.12 फेब्रुवारी 2025 रोजी वेदांत महाविद्यालय विठ्ठलवाडी येथे उडान फेस्टिवलचं आयोजन करण्यात आलं होतं यामध्ये जीवनदीपच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. त्यामध्ये स्कीट मध्ये सहभागी होऊन तसेच पोवाडा गायन मध्ये तृतीय क्रमांक पटकावून यश संपादन केल आहे. यावेळेस विद्यार्थ्यांना सहकार्य करण्यासाठी महाविद्यालयाच्या प्रा रूपाली तरे व प्रा निकिता घोडविंदे उपस्थित होत्या. या फेस्टिवल साठी जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे संचालक प्रशांत घोडवींदे प्रा.डॉ.के.बी. कोरे, उप प्राचार्य हरेंद्र सोष्टे यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देत सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# ‘संत सेवालाल महाराज’ यांच्या जयंती दिनी महापालिकेतर्फे अभिवादन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / कल्याण : संत सेवालाल महाराज यांच्या जयंती दिनी महापालिका मुख्यालयात आज त्यांच्या प्रतिमेस महापालिका उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) संजय जाधव यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या समयी सहा.सुरक्षा अधिकारी सुरेश पवार व इतर अधिकारी/कर्मचारी वर्ग, यांनी देखील संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण करुन अभिवादन केले.

# भिवंडीत अनधिकृत बांधकामे पाडली



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

भिवंडी : भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचे मा. आयुक्त तथा प्रशासक, मा. अतिरिक्त आयुक्त व मा. उपायुक्त (अन.बा. व अति नि. विभाग) यांच्या निर्देशानुसार आज दि. १४/२/२०२५ रोजी प्रभाग समिती क्र.३ च्या कार्यक्षेत्रातील मौजे कामतघर, नविन कणेरी सि.नं.३०/०, सि.स.नं १४२,९१५१ या जागेतील येथील घर नं. १८७/१/२८/जी/१, व १८८/१/२९/जी/२, या ठिकाणी झालेले गळयाचे बांधकाम बाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कायदेशीर प्रक्रिया (DPL) पूर्ण करून उक्त बांधकाम भिवंडी मनपा अतिक्रमण कर्मचारी तसेच मनपा जेसीबी च्या सहाय्याने संपूर्णतः निष्कासित करण्याची कारवाई सुरेंद्र भास्कर भोईर सहाय्यक आयुक्त, प्र.स.क्र. ३ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.




# उल्हासनगरातील मालमत्ता कर थकवणाऱ्यांची गय नाही

## अभय योजना बंद
## १२८ नळजोडणी खंडित;३१२५ नळधारकांना वॉरंट; तर ४८ मालमत्तांवर जप्ती

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

उल्हासनगर : महानगरपालिकेचा एकमेव उत्पन्न स्त्रोत करवसुली हाच घसरल्याने शहरातील विविध विकास कामांना खीळ बसलीय. यावर लक्ष केंद्रित करून नवनियुक्त आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी कर वसुली प्रणालीवर अधिक जोर दिलाय. अनेकदा संधी देऊनही शहरातील करबुडव्यांनी थकबाकी जमा न केल्याने आयुक्तांनी कर वसुलीचे सख्त पाऊलं उचलण्या चे आदेश कर विभागास दिले आहेत. त्यामुळे आता करबुड्यांची कोणतीही गय केली जाणार नाही. अशी माहिती कर विभागाच्या अधिकारी निलम कदम यांनी माध्यमांना दिलीय.

त्या म्हणाल्या की, गेल्या १० दिवसांत थकबाकी न भरणार्या १२८ घरांचे पाणी कनेक्शन तोडण्यात आलंय. याशिवाय ३१२५ घरांना वॉरंट पाठवण्यात आले असून ४८ जणांना जप्तीच्या नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

* कर वसुली साठी महापालिकेचे कठोर धोरण ...

नीलम कदम म्हणाल्या की, आयुक्तांनी ३१ मार्चपर्यंत कर वसुली करीता सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यां च्या सर्व सुट्यांसहित, शनिवार, रविवारच्या सुट्ट्या ही रद्द केल्या आहेत. गेल्या दहा दिवसांत २५ मालमत्तांकडून २० लाख ५१ हजार १०७ रुपयांची वसुली करण्यात आली आहे. त्याचबरोबर आतापर्यंत एकूण २ कोटी १९ लाख ७ हजार १५ रुपयांचा कर जमा झाला आहे.

जे करदाते वेळेवर कर भरणार नाहीत, अशा थकबाकीदारांच्या घरोघरी वाद्य वाजवून, भेटी देऊन कर वसुली केली जाईल, तसेच घंटागाडी मधूनही ऑडिओ क्लिप द्वारे याबाबत जनजागृती केली जाईल. यामुळे करदात्यांना कोणत्याही कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागू नये, यासाठी वेळेवर कर भरण्याचे आवाहन करण्यात निलम कदम यांनी केले आहे. महापालिकेने कर भरणी बाबत घेतलेल्या या आक्रमक पवित्र्या मुळे आता थकबाकीदार आणि कर बुडव्यांमध्ये घबराहट पसरली आहे.

## मुरबाड पोलीस स्थानकात महाआरोग्य शिबीर
# सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घेतला लाभ




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

मुरबाड : मुरबाड मधील नामांकित इन्फिगो आय केअर हॉस्पिटल मुरबाड व शिवनेरी रुग्णालय मुरबाड यांच्या माध्यमातून मुरबाड पोलीस स्टेशन मधील सर्व अधिकारी कर्मचारी यांच्यासाठी ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ.डी. एस. स्वामी यांच्या नेतृत्वाखाली मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या शिबिरात नेत्र तपासणी, रक्तदाब तपासणी, शुगर तपासणी, ईसीजी तपासणी तसेच मोफत गोळया औषधे असा विविध प्रकारच्या तपासण्या करण्यात आल्या या शिबिराचे उद्घाटन मुरबाड पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप गीते, महाराष्ट्र शासन अधिस्वीकृती पत्रकार बाळासाहेब भालेराव यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरात जवळपास पोलीस अधिकारी, कर्मचारी कुटुंबीय, तसेच जेष्ठ नागरिकांनी सह ७५जणांनी सहभाग नोंदवून शिबिराला उत्कृष्ट प्रतिसाद दिला. या शिबिरासाठी इन्फिगो आय केअर हॉस्पिटल मुरबाड चे केंद्रप्रमुख रोहित झुंजारराव व शिवनेरी रुग्णालय चे करण जाधव यांनी विशेष सहकार्य केले त्याबद्दल मुरबाड पोलीस स्टेशन च्या वतीने त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

मुरबाड पोलीस स्टेशनचे नवनियुक्त वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप गीते यांनी आपला पदभार स्वीकारल्यापासून मुरबाड पोलीस स्टेशनमध्ये अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून पोलीस स्टेशनची प्रतिमा मुरबाड करांमध्ये चांगल्या प्रकारे निर्माण करण्यासाठी चांगले काम करीत आहेत. आज आयोजित केलेला महारोग शिबीरामध्ये स्वतः संदीप गीते सहभागी होऊन सर्व कर्मचारी अधिकारी कुटुंबीय यांना उपस्थित राहण्यासाठी आवाहन करण्यात आले होते. तसेच महा आरोग्य शिबिरासाठी आलेल्या सर्व डॉक्टर कर्मचारी नर्सेस यांचा सन्मान करण्यात आला . शिबिरात सहभागी झालेल्या पोलीस अधिकारी व पोलिस कर्मचाऱ्यांनी यांनी शिबिराचे कौतुक करून हॉस्पिटल प्रशासनाचे आभार मानले. हॉस्पिटलच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# मराठी भाषा गौरव दिनानिमित्त ‘दिलखुलास’ कार्यक्रम



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

मुंबई : मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर पहिल्यांदाच नवी दिल्ली येथे ’98 वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन संपन्न होत आहे’. त्याअनुषंगाने माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित ’दिलखुलास’ कार्यक्रमातून ’98 वे अखिल भारतीय साहित्य संमेलन’ आणि ’मराठी भाषा गौरव दिनानिमित्त’ दिनांक 17 ते 28 फेब्रुवारी 2025 या कालावधीत विशेष मुलाखतींचे प्रसारण आकाशवाणीच्या सर्व केंद्रावरून व ‘न्यूज ऑन एआयआर’ या मोबाईल ॲपवर सकाळी 7.25 ते 7.40 या वेळेत होणार आहे.

### ‘दिलखुलास’ कार्यक्रमात मुलाखतींचे प्रसारण:

1) 98 वे ’अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनच्या अध्यक्षा आणि लोकसाहित्याच्या अभ्यासक प्रा. डॉ. तारा भवाळकर यांची ’अखिल भारतीय साहित्य संमेलनाची तयारी’ या विषयावर मुलाखत सोमवार दि. 17, मंगळवार दि. 18 आणि बुधवार दि. 19 फेब्रुवारी 2025 रोजी प्रसारित होणार आहे. ही मुलाखत निवेदक चिंतामणी सहस्त्रबुद्धे यांनी घेतली आहे.

2) इतिहास अभ्यासक प्रा. इंद्रजीत सावंत यांची ’शिवकालीन मराठी भाषा’ या विषयावरील मुलाखत गुरूवार दि. 20 आणि शुक्रवार दि. 21 फेब्रुवारी 2025 रोजी प्रसारित होणार आहे. ही मुलाखत माहिती अधिकारी वृषाली पाटील यांनी घेतली आहे.

3) शिवाजी विद्यापीठाच्या मराठी भाषा विभागाचे प्रमुख तथा संत तुकाराम अध्यासनाचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांची ’मराठी संत साहित्याचे भाषेतील महत्व’ या विषयावरील मुलाखत शनिवार दि. 22 फेब्रुवारी, 2025 रोजी प्रसारित होणार आहे. ही मुलाखत माहिती अधिकारी वृषाली पाटील यांनी घेतली आहे.

4) लेखक आणि प्रशासक लक्ष्मीकांत देशमुख यांची ’मराठी भाषेच्या विकासात साहित्य संमेलनांची भूमीका’ या विषयावरील मुलाखत सोमवार, दि. 24 आणि मंगळवार दि. 25 फेब्रुवारी 2025 रोजी प्रसारित होणार आहे. ही मुलाखत निवेदक श्रीदत्त गायकवाड यांनी घेतली आहे.

5) साहित्य अकादमीच्या केंद्रीय मंडळाचे सदस्य तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृती मंडळाचे सदस्य, मराठी साहित्य व भाषा अभ्यासक डॉ. प्रमोद मूनघाटे यांची ’मराठी भाषेचा उगम आणि साहित्य, शिक्षण आणि डिजिटल युगात मराठी भाषेचे महत्व’ या विषयावरील मुलाखत बुधवार, दि. 26, गुरूवार दि. 27 आणि शुक्रवार दि. 28, फेब्रुवारी 2025 रोजी प्रसारित होणार आहे. ही मुलाखत निवेदक शिबानी जोशी यांनी घेतली आहे.

मराठी साहित्याच्या वैभवशाली परंपरेला नवा सन्मान मिळवून देणारे ’98 वे अखिल भारतीय साहित्य संमेलन’ 21, 22 आणि 23 फेब्रुवारी 2025 या कालावधीत पार होणार आहे. या संमेलनात देशभरातील साहित्यिक, कवी, लेखक, विचारवंत आणि वाचक एकत्र येणार आहेत. साहित्यिक दृष्टिकोन, नव्या लेखकांना मिळणारी संधी आणि विविध विषयांवरील विचारमंथन करणारे हे संमेलन केवळ एक कार्यक्रम न राहता मराठी संस्कृतीचा एक अभिजात सोहळा ठरणार आहे. तसेच 27 फेब्रुवारी 2025 रोजी ’मराठी भाषा गौरव दिवस’ राज्यभरात साजरा करण्यात येणार आहे. या निमित्त मराठी भाषेचा उगम, इतिहास, संत साहित्य, शिवकालीन मराठी भाषा आणि तंत्रज्ञानाच्या युगात मराठी भाषेचे स्थान व महत्व आदी विषयांवर ’दिलखुलास’ कार्यक्रमात मान्यवरांच्या मुलाखतीं घेण्यात आल्या आहेत.

# संत सेवालाल महाराज यांना भिवंडी महानगरपालिकेतर्फे अभिवादन




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

भिवंडी : शासन परिपत्रक व भिवंडी महानगरपालिका मा. प्रशासक तथा आयुक्त यांच्या निर्देशानुसार दि.१५/०२/२०२५ रोजी संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त महानगरपालिका मुख्यालयातील तळमजल्यावरील सभागृहात भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या वतीने मा. उप-आयुक्त श्री. शैलेश दोंदे यांच्या शुभहस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम संपन्न झाला.

बंजारा समाजातील श्रेष्ठ समाजसुधारक. त्यांचा जन्म बंजारा कुटुंबामध्ये आंध्र प्रदेश राज्यातील गुलालडोडी तांडा, ता. गुत्ती, जि. अनंतपुर येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भीमा नाईक व आईचे नाव धरमणी होते. बंजारा समाजाचा प्रमुख व्यवसाय बैलांच्या पाठीवर धान्याची गोणी वाहण्याचा होता. भीमा नाईकांना सेवालाल (सेवाभाया), बहू. हप्पा, भाणा हे चार पुत्र होते. यांच्यापैकी सेवालाल ज्येष्ठ होते. सुरुवातीपासून ते विरक्त स्वभावाचे होते. त्याकाळी बंजारा समाज निरक्षर होता. त्यामुळे सेवालाल महाराजांनी आजन्म अविवाहित राहून समाज सुधारण्याचे कार्य हाती घेतले. संत सेवालाल यांचे विचार मानवता वादाची शिकवण देणारे आहेत. समाजातील भोळ्या समजुती, अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, सत्य, अहिंसा याविषयीचे त्यांचे विचार वचने, दोहे, कवने व भजने या रूपात प्रकट झाले आहेत. सत्य हाच खरा धर्म, नेहमी सत्याचरण करावे, सत्य जाणणे यातच जीवनाचे सार आहे. ही त्यांची शिकवण होती. आंध्र प्रदेशातून ते महाराष्ट्रात आले. त्यानंतर संपूर्ण भारतभर भ्रमण केले. दिल्ली येथे त्यांच्या नेतृत्वाखाली एक मोठी पंचायत भरविण्यात आली होती. बंजारा समाज त्याकाळी अनेक धर्मात विभागला होता, ते त्यांनी रोखले. रुईगड, ता. दिग्रस, जि. यवतमाळ येथे त्यांनी समाधी घेतली. अशा या थोर संतास महानगरपालिकेतर्फे अदरांजली वाहण्यात आली.

याप्रसंगी नियंत्रण अधिकारी (शहर विकास विभाग) सुदाम जाधव, प्रभाग अधिकारी राजेद्र वरळीकर, उप-आभियंता (विद्युत) ज्ञानदेव वाघमारे, कार्या. अधिक्षक (बांधकाम) प्रकाश पाटील, कार्या. अधिक्षक (नगररचना) अनिल जाधव, मनपा कर्मचारी व बंजारा समाजाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षक पुत्र प्रविण पवारची कॅप्टन पदी नियुक्ती



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

कल्याण : ठाणे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उसाटणे, अंबरनाथ येथील मुख्याध्यापिका संगीता पवार आणि बृहमुंबई महानगरपालिकेतून सेवानिवृत्त शिक्षक नंदलाल पवार यांचा सुपुत्र प्रविण पवार याने कॅप्टन पदाची परीक्षा दिली आणि उत्तम गुणांनी उत्तीर्ण होऊन अकासा एअर मध्ये कॅप्टन पदावर प्रविण याची निवड झाली.

गणेश विद्यामंदिर, कल्याण पूर्व या शाळेत शिक्षण घेणारा प्रविण हा लहानपणापासून हुषार, चाणाक्ष व चुणचुणीत आहे हे त्याच्या वडिलांनी हेरले होते. प्रवीण 7 वी त असताना त्याच्या वडिलांनी, प्रविणचे तत्कालीन तलवारबाजी प्रशिक्षक अंकुर आहेर व शाळेतील शिक्षक कै. गुणेश डोईफोडे यांना सांगीतले होते की, माझ्या प्रविणला पायलट करायचे आहे. सातवीत असतानाच प्रविणच्या वडिलांनी त्याला बारामती येथील पायलट ट्रेनिंग सेंटर दाखवले. तेव्हापासून प्रविण आणखी झपाट्याने अभ्यासाला लागला.

शिक्षणाच्या प्रवासात प्रविण तलवारबाजी प्रशिक्षण घेत होता. त्याने शालेय जिल्हा, विभाग व राज्य स्पर्धांमध्ये खेळातील चुणूक दाखवली. तसेच ठाणे जिल्हा तलवारबाजी असोसिएशनचे सचिव विलास वाघ व महाराष्ट्र तलवारबाजी असोसिएशनचे तत्कालीन सचिव अशोक दुधारे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्पर्धा गाजवल्या. पुढे तैवान येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेसाठी प्रविणची निवड झाली. या क्रीडा क्षेत्रातील प्रवासात ठाणे जिल्हा एकविध क्रीडा महासंघाचे अध्यक्ष आप्पा शिंदे यांचे सहकार्य व आशीर्वाद पाठीशी होता.

बारावीची परीक्षा झाल्यावर प्रविणने पायलट होण्यासाठी पूर्व परीक्षा दिली. त्यातून पुढे कॅनडा येथे पायलटचे खडतर प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केले. भारतात येऊन तो येथील परीक्षा उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाला.

सुरवातीला जेट एअरवेज मध्ये अनुभव घेतला. पुढे अकासा एअरमध्ये तो पायलट पदावर नियुक्त झाला. त्यानंतर त्याने कॅप्टन पदाची परीक्षा दिली. पायलट म्हणून केलेल्या कार्यातील प्रामाणिकपणा, थरारक उड्डाण, उल्लेखनीय कामगिरी, कष्ट करण्याची तयारी, समर्पण व चिकाटी यातूनच अकासा एअरने प्रवीणची कॅप्टन पदासाठी निवड केली आहे.

प्रविणच्या या अद्वितीय यशामध्ये प्रविणचे वडील नंदलाल, आई संगीता, बहिण जान्हवी, पत्नी तन्वी व मुलगा ह्दिान यांचा मोलाचा सहभाग आहे. त्यांच्या मौलिक पाठींब्यामुळेच मी कॅप्टन पदावर नियुक्त झालो, असे भावनिकतेने प्रविणने सांगितले.

प्रविणचे वडील म्हणाले, पायलट होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या मुला मुलींनी हे लक्षात घ्यावे की, पायलट होण्यासाठी केवळ पैसा असून उपयोग नाही, तर प्रचंड अभ्यास करण्याची तयारी, जिद्द व चिकाटी हे महत्वाचे आहे.

प्रविणची कॅप्टन पदावर नियुक्ती झाल्याबद्दल ठाणे जिल्हा एकविध क्रीडा महासंघाचे अध्यक्ष आप्पा शिंदे, आप्पा शिंदे क्रीडा प्रतिष्ठानचे अध्यक्ष विक्रांत शिंदे, भारतीय सैनिकी विद्यालयाच्या शाळा समिती अध्यक्षा राजेश्वरी शिंदे, कल्याण डोंबिवली महानगरपालिका माजी नगरसेवक नवीन गवळी, कल्याण तालुका शारीरिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष लक्ष्मण इंगळे, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारार्थी अंकुर आहेर तसेच कल्याण डोंबिवली मधील सर्व क्रीडा शिक्षक व नातेवाईकांनी कौतुकाचा वर्षाव केला.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका भाजप स्वबळावर?



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

मुंबई : येत्या काही दिवसांमध्ये राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊ शकतात, असे संकेत मिळत आहेत. या पार्श्वभूमीवर आता सर्वच राजकीय पक्षांकडून तयारीला सुरुवात झाली आहे. समोर आलेल्या माहितीनुसार काही पक्षांकडून स्वबळाची देखील चाचपणी होत आहे, भाजप देखील स्वबळावर निवडणूक लढू शकतो अशी चर्चा सुरू आहे.

### नेमकं काय म्हणाले महाजन?

स्वबळाचा नारा मी अजून दिलेला नाही, मात्र जळगाव जिल्ह्यामध्ये भाजप 50 टक्क्यांपेक्षा जास्त जागा जिंकू शकते. जळगाव जिल्हा परिषदेमध्ये 70 पेक्षा जास्त जागा भाजप जिंकेल, मित्र पक्षही आमच्यासोबत असतील. जळगाव, धुळे, नंदुरबार, नगर, नाशिक या जिल्ह्यांमध्ये आम्हाला स्पष्ट बहुमत मिळाले आहे, असं गिरीश महाजन यांनी म्हटलं आहे.

दरम्यान शिवसेना ठाकरे गटातून शिवसेनेत आणि भाजपमध्ये जोरदार इनकमिंग सूरू आहे. अशातच शिवसेना ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव हे देखील नारज असल्याची माहिती समोर येत आहे. यावर देखील महाजन यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ’तिकडे एकाच माणसाला संधी आहे, ते म्हणजे संजय राऊत, क्षमतेपेक्षा जास्त ते त्या ठिकाणी बोलत आहेत. क्षमता नसताना सुद्धा बडबड करत आहेत. बाकी लोकांना तिथे कुठेही स्थान नाही, अशी प्रतिक्रिया यावेळी गिरीश महाजन यांनी दिली आहे. त्यांनी पुन्हा एकदा शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार निशाणा साधला आहे..

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

## रोटरी क्लब ऑफ कल्याण रिव्हर्स साईड तर्फे पत्रकारांचा सन्मान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

कल्याण : रोटरी क्लब ऑफ कल्याण रिव्हर साईड तर्फे पत्रकारांशी संवाद साधण्यासाठी पत्रकारांना आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी पत्रकार करीत असलेल्या उल्लेखनीय कामाबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. कल्याण पश्चिमेतील दत्त आळी बालक मंदिर सभागृह येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांमध्ये 28 पत्रकारांना ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. रोटरी क्लब ऑफ कल्याण रिव्हर साईडचे अध्यक्ष योगेश कोल्हापुरे यांनी रोटरी क्लब करीत असलेले काम, राबत असलेले प्रोजेक्ट याबाबत माहिती दिली. पत्रकार व रोटरी क्लब मिळून एकत्र काम करण्याची इच्छा त्यांनी यावेळी व्यक्त केली. पत्रकार व रोटेरियन अनघा पाटील यांनी कार्यक्रमाचे सुबद्धरित्या नियोजन केले. पत्रकारांनी रोटरी सारख्या सामाजिक संस्थेचे काम लोकांपर्यंत पोहोचवणे व गरजू समाजाला रोटरीन पर्यंत पोहोचवणे ही आजची गरज आहे या विषयावर देखील चर्चा झाली.



संक्षिप्त

## अंबरनाथमधील नाट्यगृहपडदा उघडण्यापूर्वीच वादातीत




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ : अंबरनाथ मधील नाट्यगृह हे अनेक वर्षांपासूनच भिजत पडलेलं घोंगडं होतं. अंबरनाथ पूर्वे कडील भ्रष्टाचार व प्रशासकीय दिरंगाईत नाट्यगृह निर्मितीचा प्रयत्न फसला. यानंतर अंबरनाथ पश्चिम मधील सर्कस मैदानात नवीन नाट्यगृह निर्माण होते झालं अंतिम टप्प्यात आहे मात्र त्या नाट्यगृहाला नाव कोणते द्यावे या वरून अंबरनाथ मधील शिवसेना आणि संभाजी ब्रिगेड यांच्यामध्ये कलगी तुरा रंगला आहे.

नुकताच खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी या नाट्यगृहाला भेट देऊन पूर्णत्वाचा आढावा घेतलाय. याआधी महाराष्ट्र मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष अभिनेते प्रशांत दामले यांनी एका पत्रकाद्वारे अंबरनाथच्या या नुतन नाट्यगृहास ज्येष्ठ रंगकर्मी, नाट्य लेखक, दिग्दर्शक बाळ कोल्हटकरांचे नाव द्यावे अशी मागणी अंबरनाथ नगरपरिषदेच्या प्रशासकांकडे केलीय. या पत्राचा प्रचार समाज माध्यमातुन करून माजी नगराध्यक्ष सुनील चौधरी यांनी शिवसेनेच्या वतीने या मागणीस दुजोरा दिलाय. तर दुसरीकडे मात्र संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष सुनील अहिरे यांनी एका निवेदनाद्वारे या नाट्यगृहास साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे नाव द्यावे अशी मागणी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदेकडे केलीय. त्यामुळे आता या नाट्यगृहा च्या नामकरणाचा वाद चिघळतोय की काय अशी परिस्थिती निर्माण होतेय.

अंबरनाथचे सानिध्य कोल्हटकर यांना लाभले असून 'वाहतो ही दुर्वाची जुडी' सारखे अजरामर नाट्य प्रयोग अंबरनाथच्या हेरंब मंदिरात झाल्याचे दामले यांनी पत्रकात म्हटलंय. याचे स्मरण म्हणून या नाट्यगृहास कोल्हटकर यांचे नाव द्यावे असे त्यांनी पत्रकात नमूद केलंय. तर, अंबरनाथ हा बहुजन बहुलांचं शहर आहे. अशिक्षित अण्णा भाऊंनी नाटक, लोकनाट्य, पोवाडे, कथा, कादंबरी, कविता, चित्रपट ते सार्याच साहित्य प्रांतात वर्चस्व गाजवलंय. ज्यांच्या साहित्याचा झेंडा अटकेपार रशियात फडकलाय अशा उपेक्षित साहित्य रत्नाचे या नाट्यगृहास नाव द्यावे व त्यांचा व समस्त बहुजनांचा यथोचित सन्मान अंबरनाथ नगरपालिकेने करावा, अन्यथा संभाजी ब्रिगेड रस्त्यावर उतरेल असा आग्रह संभाजी ब्रिगेडचे सुनील अहिरे आणि प्रफुल्ल थोरात यांनी प्रशासक डॉ प्रशांत रसाळ यांच्या कडे धरला आहे.

## जिल्हा परिषदेत संत सेवालाल महाराज यांना अभिवादन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / ठाणे :

संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज, दि.15 फेब्रुवारी, 2025 रोजी जिल्हा परिषदेत लघुपाटबंधारे विभागातील कार्यकारी अभियंता दिलीप जोकार यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी साहाय्य प्रशासक अधिकारी जगदीश मिरकुटे, कनिष्ठ प्रशासक अधिकारी सोनल चवाते तसेच सर्व अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

नियमित वाचा
दै. ठाणे
जीवनदीप वार्ता

# न्यू इंडिया बँकेबाहेर ठेवीदारांची गर्दी उसळली




### आरबीआयकडून कर्ज वितरण

### ठेवी काढण्यास सहा महिन्यांसाठी बंदी

ठाणे : न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेवर भारतीय रिझर्व्ह बँकेने नवीन कर्ज वितरण व ठेवी काढण्यास सहा महिन्यांसाठी बंदी घातल्याने आता ठेवीदारांनी शुक्रवारी सकाळपासून बँकेच्या शाखांबाहेर गर्दी केली. आमच्या ठेवी परत द्या, अशी विनंती ठेवीदार करत होते. अनेकांच्या डोळ्यांत अश्रू दाटून आले. आपल्या ठेवींचे काय होणार? असा प्रश्न त्यांना सतावत आहे. परंतु बँकेच्या कर्मचाऱ्यांकडून फक्त आश्वासने दिली जात होती. अनेक ठेवीदारांचे लाखो रुपये बचत खात्यात अडकले असून स्वतःची जमापुंजी काढण्यासाठी परवानगी मागण्याची नामुष्की ठेवीदारांवर ओढावली. भारतीय रिझर्व्ह बँकेने गुरुवारी न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेवर नवीन कर्ज वितरण व ठेवी काढण्यास सहा महिन्यांसाठी बंदी घातली. बँकेत अलीकडील काळात घडलेल्या काही घडामोडींमुळे ठेवीदारांच्या ठेवींचे रक्षण करण्यासाठी हा निर्णय घ्यावा लागला असल्याचे आरबीआयने म्हटले आहे. बँकेवर निर्बंध आल्याची माहिती ठेवीदारांना मिळताच, शुक्रवारी सकाळपासून बँकेच्या शाखांबाहेर ठेवीदारांची गर्दी झाली. ठाण्यातील नितीन कंपनी परिसरात बँकेची शाखा आहे. या शाखेबाहेर नागरिकांची गर्दी जमली. कोणताही वाद होऊ नये, यासाठी पोलिसांचाही कडेकोट बंदोबस्त पाहायला मिळाला. वसंत विहार परिसरातील बँकेच्या शाखेजवळही हेच चित्र होते. यावेळी ठेवीदार आपल्या ठेवी परत कधी मिळतील? याची विचारणा करत होते.

# महिलांच्या रोजगारासाठी महापालिका सरसावली

उल्हासनगर: उल्हासनगरात महिलांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी उल्हासनगर महापालिकेच्या महिला बाल विकास विभागाने पुढाकार घेतला आहे. महिलांनी व्यावसाय करण्यासाठी शहराच्या विविध भागात ५० केबिन उभे करण्यात आले आहेत. हे केबिन फक्त महिला बचत गटांना देण्यात येणार आहेत. आतापर्यंत ५२ महिला बचत गटांनी केबिनसाठी अर्ज केले आहेत. अशी माहिती महिला बाल विकास विभागाचे नितेश रंगारी यांनी दिली. उल्हासनगरात एकूण १५०० महिला बचत गट आहेत. या महिला बचत गटांना उद्योग व्यवसायासाठी राज्य केंद्र आणि महापालिकेच्या वतीने विविध प्रकारे मदत करण्यात येते. या बचत गटांमार्फत महिलांना रोजगार उपलब्ध केले जात आहेत. दरम्यान तत्कालीन मनपा आयुक्त अजीज शेख यांच्या संकल्पनेतून महिलांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी शहरातील विविध भागात आठ बाय आठची केबिन तयार करून ती केबिन महिला बचत गटांना देण्यासंबधी एक प्रस्ताव १६ ऑगस्ट २०२४ मंजूर करण्यात आला. त्यातील ५० केबिन तयार करण्यासंबंधी निविदा मागवून ११ डिसेंबर रोजी या केबिनचे कंत्राट देण्यात आले. या केबिन साठी एक कोटी २४ लाख १५ हजार रुपये खर्च करण्यात आले आहेत. सध्या शहराच्या विविध भागात केबिन लावण्यात आले आहेत. या केबिनसाठी १५०० पैकी ५२ महिला बचत गटांनी अर्ज दाखल केले. या पन्नास केबिनचे वाटप अद्याप करण्यात आले नसून ज्या महिला बचत गटांनी अटी शर्थीची पूर्तता केली असेल त्यांनाच मनपा आयुक्त यांच्या हस्ते केबिन वितरित केली जाईल, ही प्रक्रिया लवकरच पूर्ण करण्यात येईल, अशी माहिती रंगारी यांनी दिली.

# अंबरनाथ रेल्वे लोहमार्गातील बाधितांचे होणार पुर्नवसन



अंबरनाथ : मध्य रेल्वेच्या मुंबई पुणे लोहमार्ग विस्तारा दरम्यान अनेक घरे बाधित होताहेत. मात्र, गोरगरिबांना वाऱ्यावर सोडले जाणार नाही हा तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा शब्द होता. त्यानुसार, अंबरनाथ मधील भीम नगर, स्वामी नगर सारख्या अनेक झोपडपट्ट्या या रेल्वे रुळाच्या चौपदरीकरणात बाधितांचे लवकरच पुनर्वसन होऊन नवीन घरे उपलब्ध होत आहेत. याकरिता,, अंबरनाथ मधील शिवसेनेसह अनेक सामाजिक राजकीय संघटनांनी खासदार डॉ श्रिकांत शिंदे यांच्या माध्यमातून प्रयत्न केले होते. त्यात महत्वाची भूमिका असणार्या युवा सेनेच्या ही पाठपुराव्याला यश आल्याने समाधान व्यक्त केले जातंय.

या बाधितांची कैफियत घेऊन अनेकदा माजी नगरसेवक एड. संदीप भराडे, युवा सेनेचे निरीक्षक एड. निखिल वाळेकर यांनी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्यामार्फत रेल्वे प्रशासना कडे पाठपुरावा केला होता.

त्याला यश येत आता बाधितांचे पुर्नवसन होत ९० कुटुंबांना घरे मिक्सर आहेत. तर, ६५ कुटुंबांना शहाड येथे आणि उर्वरितांना पनवेल येथे विस्थापित केले जाणार असल्याची माहिती एम आरडी अधिकारी संतोष वाडेकर यांनी दिली. यामुळे हवालदील झालेल्या अंबरनाथ मधील बाधित रहिवाशांमध्ये आता आनंद व्यक्त होत आहे. या कामी डॉ श्रिकांत शिंदे यांनी वारंवार बाधितांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सूचना दिल्या होत्या. यासाठी शिवसेनेच्या माध्यमातून निखिल वाळेकर आणि संदीप भराडे यांनी इथल्या धास्तावलेल्या नागरिकांना धीर देत रेल्वे मंत्रालयाकडे पत्रव्यवहार सुरू ठेवला होता. घरे उजाडणे नव्हे तर विस्कटलेली घरे वसवणे ही शिवसेनेची भूमिका राहिलेली आहे. उर्वरित बाधितांनाही विस्थापित केल्याशिवाय शिवसेना स्वस्थ बसणार नाही अशी शाश्वती एड. संदिप भराडे यांनी यावेळी व्यक्त केली.

# विद्यार्थ्यांची पालकांविषयीच्या कृतज्ञतेच्या जाणीवेसाठी मातृ पितृ दिन साजरा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : संपूर्ण जगभरात १४ फेब्रुवारी हा 'व्हॅलेंटाईन डे' म्हणून साजरा केला जात असताना, एसएसटी महाविद्यालयाने मात्र या दिवशी आपली मागील अनेक वर्षांपासून सुरू केलेली अनोखी परंपरा जोपासत 'पॅरंटाईन डे' साजरा केला.

आपल्या पालकांविषयी असलेल्या प्रेमाची आणि कृतज्ञतेची जाणीव विद्यार्थ्यांना व्हावी, तसेच भारतीय संस्कृतीतील पारंपरिक मूल्ये रुजवली जावीत, या उद्देशाने महाविद्यालयाचे संस्थापक प्राचार्य डॉ.पुरस्वानी आणि आयक्यूएसी समन्वयक डॉ.खुशबू पुरस्वानी यांच्या संकल्पनेतून या उपक्रमाला सुरुवात करण्यात आली होती.

यंदाही हा दिवस महाविद्यालयाच्या प्रांगणात मोठ्या उत्साहात आणि भावनिक वातावरणात अनेक पालक, विद्यार्थी आणि प्राध्यापकांच्या उपस्थितीत पार पडला. या विशेष सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून उल्हासनगर महानगरपालिकेचे उपायुक्त अजय साबळे, एसएसटी महाविद्यालयाचे चेअरमन आणि संस्थापक प्राचार्य डॉ. पुरस्वानी, उपप्राचार्य व राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. जीवन विचारे, तसेच उपप्राचार्य डॉ. दीपक गवादे उपस्थित होते.विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांची औक्षण करून पूजा केली, त्यांच्यासमोर कृतज्ञता व्यक्त केली, तसेच आपल्या चुका मान्य करत त्यांची माफीही मागितली. या सोहळ्यात डोळ्यांत आनंदाश्रू आणणाऱ्या अनेक हृदयस्पर्शी क्षणांची अनुभूती सर्वांनी घेतली.ड्रामानॉमिक्स विभागाच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्याच्या माध्यमातून वृद्धाश्रमांची संख्या कमी करण्याचा आणि पालकांना प्रेमाने आपल्यासोबत ठेवण्याचा संदेश दिला, तर डान्स मॅनिया गटाने सादर केलेल्या डोंबारी लोकनृत्य आणि गणेश वंदनेने संपूर्ण सभागृह मंत्रमुग्ध झाले. भावनिक झालेल्या पालकांनी या उपक्रमाचे भरभरून कौतुक करत विद्यार्थ्यांच्या यशाबद्दलचा आनंद व्यक्त केला. विद्यार्थ्यांनीही आपल्या प्रतिक्रिया देताना पालकांविषयी कायम आदर आणि प्रेम बाळगण्याचा संकल्प केला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे एनएसएस युनिट, डीएलएलइ युनिट, 'संजीवनी' सांस्कृतिक समिती आणि विविध विभागांचे प्राध्यापक आणि स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी आपले मोलाचे योगदान दिले.

# शिवजयंती निमित्त छत्रपतींना साहसी मानवंदना

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची १९ फेब्रुवारी रोजी जयंती संपुर्ण महाराष्ट्रात साजरी केली जाते.

ठाणे जिल्हयातील कल्याण तालुक्यातील कोळीवली गावात शेतकरी कुस्तीपटू कै. बळिराम कारभारी यांचा सुपुत्र अजित कारभारी यांनी छत्रपती शिवाजी राजांची शिवजयंती साहसी व अदम्य धाडसी वृत्तीने साजरा करायचे ठरवले आहे. अजित कारभारी यांनी दिनांक १९ फेब्रुवारी रोजी रशिया येथे तब्बल १५००० फुटवरून पॅराशूट जंपिंग - ३०°C तापमानात शिवाजी महाराजांच्या प्रतीमेचा बॅनर आंतरराष्ट्रीय पातळीवर फडकवून (भारतीय प्रथम नागरीक) विक्रम करण्याचा प्रयत्न करणार आहे.

अजित कारभारी यांनी भारतीय वायू सेना साहसी संचालनालय दिल्ली येथे ५ पॅराजंप करून प्राथमिक प्रशिक्षण सन २००७ ला पुर्ण केले. २०१३ ला बारामती स्कायडायव्हींग महोत्सव येथे २ जंप केले.

२०१५ ला एअर फील्ड, सागर जिल्हा, मध्यपेदेश येथे २ जंप केले. २०१८ ला रशिया येथे प्रगत पॅराजंपिंग पाठयक्रम AFF-10 जंप पुर्ण केले. २०१९ ला रशिया २५ जंप पूर्ण करून USPA चे 'अ' परवाना मिळविला. २०२४ ला थायलंड येथे पुढील २३ जंप पुर्ण करून USPA चे 'ब' परवाना मिळविला.

२०२५ स्कायहाय उजैन येथे ब्रिगेडियर शेखावत यांनी प्रोत्साहन देवुन जानेवारी २०२५ ला २ जंप पुर्ण करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत नेत्र तपासणी

### महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध मोतीबिंदूतज्ञ डॉक्टर वरुण गुप्ता मुरबाडमध्ये


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील नागरिकांसाठी मुरबाड शहरामध्ये कार्यरत असणाऱ्या इन्फिगो आयकेयर हॉस्पिटल मुरबाड मध्ये महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध मोतीबिंदू तज्ञ डॉ वरून गुप्ता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त गुरुवार दि. १९ फेब्रुवारी २०२५ रोजी ठिक सकाळी ११ ते ४ वाजेपर्यंत इन्फिगो आय केअर हॉस्पिटल मुरबाड उपलब्ध राहतील

सदर शिबिरात मुरबाड तालुक्यातील ज्येष्ठ नागरिकांसाठी मोतीबिंदू तपासणी तसेच ज्या नागरिकांची नजर अचानक कमी झाली आहे चष्म्याचा नंबर वाढत असेल किंवा डोळ्यांपुढे काळे ठिपके दिसत असल्यास डोळ्यांच्या पडद्याची समस्या असणाऱ्या नागरिकांनी सदर शिबिरात सहभागी होऊन डॉ.वरूण गुप्ता यांच्याकडून परिपूर्ण नेत्र तपासणी करून घ्यावी. या शिबिरात डॉ वरून गुप्ता नागरिकांना डोळ्यांच्या समस्या बद्दल योग्य ते मार्गदर्शन करून उपचार सुद्धा करणार आहेत तसेच ज्येष्ठ नागरिकांना मोतीबिंदू शास्त्रक्रियावर विशेष सवलत दिली जाणार आहे तरी नागरिकांनी सदर शिबिरात नाव नोंदणी करून मोठ्या संख्येने उपस्थित राहून सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा असे आवाहन इन्फिगो आय केअर हॉस्पिटल मुरबाडचे केंद्रप्रमुख रोहित झुंजारराव यांनी केला आहे

# आगीत झाडे गेली जाळून मामा-भाचे डोंगर झाला बोडका

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




ठाणे : संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील मामा-भाचे डोंगरावर लागलेल्या आगीत ठाणे महापालिकेने काही वर्षांपूर्वी लागवड केलेली झाडे मोठ्या प्रमाणात जळून खाक झाली. या परिसरात अनेक गर्दुल्ले आणि अनधिकृतपणे राहणारे लोक नशा करत असल्याने ही आग जाणीवपूर्वक लावल्याचा संशय व्यक्त करत या दुर्घटनेची चौकशी करून गुन्हा दाखल करण्याची मागणी मनसेने वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे केली. ठाणे शहरात संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा परिसर आहे. या उद्यान परिसरातील मामा-भाचे डोंगरावर दोन दिवसांपूर्वी भीषण आग लागली. या आगीत शेकडो झाडे भस्मसात झाली आहेत. ठाणे महापालिकेने काही वर्षांपूर्वी मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड केली होती.

# १६ मे रोजी घडणार 'बंजारा'ची सफर

### शरद पोंक्षे,भरत जाधव,सुनील बर्वे यांच्यासह स्नेह पोंक्षे, सक्षम कुलकर्णी आणि आदित्य धनराज यांच्याही प्रमुख भूमिका

मैत्री आणि आत्मशोधाचा सुंदर संदेश देणाऱ्या 'बंजारा' या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर करण्यात आली असून येत्या १६ मे रोजी हा चित्रपट सिक्कीमची सफर घडवतानाच मैत्रीचीही अनोखी सफर घडवणार आहे. वी. एस. प्रॉडक्शन्स आणि मोरया प्रॉडक्शन्स सादर करत असणाऱ्या या चित्रपटाची कथा, पटकथा, लेखन आणि दिग्दर्शन स्नेह पोंक्षे याने केले असून या चित्रपटात शरद पोंक्षे, भरत जाधव, सुनील बर्वे, स्नेह पोंक्षे, सक्षम कुलकर्णी आणि आदित्य धनराज यांच्या प्रमुख भूमिका आहेत. तर रोहिणी विजयसिंह पटवर्धन आणि शरद पोंक्षे या चित्रपटाचे निर्माते आहेत. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या पोस्टरमध्ये स्नेह, सक्षम आणि आदित्य हे तीन मित्र प्रवासाला निघालेले दिसत आहेत. त्यांच्या चेहऱ्यावर प्रवासाबद्दची उत्सुकता, आत्मविश्वास झळकत आहे. पोस्टरमधून 'बंजारा' हा केवळ साहसी प्रवास नसून तो भावनिक आणि मानसिक पातळीवर बदल घडवणारा, स्वतःचे स्वप्न जगण्याची प्रेरणा देणारा प्रवास असल्याचे अधोरेखित होतेय. या तीन मित्रांचा हा प्रवास त्यांच्या मैत्रीला एक अनोखी दिशा देणारा असणार आहे. त्यामुळे प्रेक्षकांसाठीही 'बंजारा' हा एक अद्भुत अनुभव ठरणार आहे. निर्माते शरद पोंक्षे म्हणतात," ही खरंतर माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने स्नेह दिग्दर्शनात पदार्पण करत असून अभिनयही करत आहे आणि त्याच्या या चित्रपटाची निर्मिती करण्याची संधी मला मिळत आहे. यापेक्षा आनंददायी काय असू शकते. यानिमित्ताने भरत आणि सुनील या माझ्या मित्रांसोबत बऱ्याच काळाने मला एकत्र कामही करता आले. मुलगा म्हणून नाही परंतु स्नेहने या चित्रपटासाठी घेतलेली मेहनत मी पाहिली आहे. 'बंजारा' हा चित्रपट प्रत्येकाच्या मनात दडलेल्या स्वप्नांचा शोध घेणारा असून प्रवासप्रेमी, साहसी व्यक्ती आणि निखळ मैत्री अनुभवणाऱ्या प्रेक्षकांसाठी 'बंजारा' एक खास भेट ठरणार आहे. दिग्दर्शक स्नेह पोंक्षे म्हणतो, "यापूर्वी मी सहदिग्दर्शक म्हणून काम केले आहे. 'बंजारा'च्या निमित्ताने मी दिग्दर्शक म्हणून समोर येत आहे. यासाठी मी बाबा, सुनील बर्वे आणि भरत जाधव यांचे विशेष आभार मानेन. कारण त्यांचा अनुभव आणि सहकार्य मला चित्रपटासाठी लाभले आहे. माझ्या या प्रवासात मला त्यांची खूप मदत झाली. तसेच माझे सहकलाकार सक्षम आणि आदित्य यांच्यासोबत काम करण्याचा अनुभवही कमाल होता. मुळात आमचा वयोगट सारखा असल्याने हा चित्रपट आम्हाला जगता आला. आम्ही ही केमिस्ट्री प्रेक्षकांना पडल्यावर दिसेलच."




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024